आदेश

श्रीमती भारती टायटस जावळे, आरोग्य सेवक महिला, यांचे अनाधिकृत गैरहजर कालावधीचा निर्णय घेणे बाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रं.आरोग्य/कार्या 2/आस्था 4/292/2021
दिनांक 01 जुन 2021

वाचा :- 1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अहमदनगर यांचेकडील दोषारोप ज्ञापन क्र आरोग्य/कार्या 2/आस्था 4/67/2019 दिनांक 27/03/2019
2) वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र सलाबतपूर यांचेकडील पत्र क्रमांक वशि/ आस्था/118/2019 दिनांक 03/04/2019
3) वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र सलाबतपूर यांचेकडील पत्र क्रमांक आस्था/134/2019 दिनांक 14/04/2019
4) अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय पुणे -1 यांचेकडील पत्र क्रमांक ससरु/वै.मंडळ/407/2019 दिनांक 17/07/2019
5) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अहमदनगर यांचेकडील अंतीम कारणे दाखवा नोटीस क्रमांक कार्या 2/आस्था 4/483/2020 दि. 12/10/2020
6) वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र सलाबतपूर यांचेकडील पत्र क्रमांक वशि/आस्था/492/2020 दिनांक 04/11/2020
7) श्रीमती भारती टायटस जावळे, सेवा निवृत्त आरोग्य सेवक महिला यांचा दिनांक 05/11/2020 रोजीचा खुलासा
8) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक आरोग्य/ कार्या 2/आस्था 4/125/2021 दिनांक 03/03/2021
9) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 (3)
10) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 नियम (6)
11) म.ना.से.(सेवा निवृत्ती वेतन) नियम 1982 चा नियम 27
12) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सेनिवे 1001/ 130/ सेवा - 4 दिनांक 2 जुन 2003
13) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील परिपत्रक क्रमांक अरजा-2016/ प्र.क्र.84/ सेवा-6 दिनांक 10 ऑक्टोबर 2017

ज्या अर्थी श्रीमती भारती टायटस जावळे, आरोग्य सेवक महिला, हया दिनांक 12/04/2018 ते 24/07/2020 अखेर अनाधिकृत गैरहजर राहुन तसेच अनाधिकृत गैरहजर असल्याने परिसरातील जनतेस आरोग्य सेवा देणेकामी अडचणी निर्माण होऊन शासकीय कामकाजामध्ये अडथळा आणुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा (वर्तणुक) 1967 चा नियम 3 चे उल्लंघन केल्याने संदर्भ क्रमांक 1 अन्वये त्यांचेवर दोषारोप ठेवण्यात आलेले होते. संदर्भ क्रमांक 2 अन्वये श्रीमती भारती टायटस जावळे, यांना ज्ञापन दोषारोप बजावले बाबत पोहच प्राप्त झालेली असुन सदंर्भ क्रमांक 3 अन्वये श्रीमती भारती टायटस जावळे, आरोग्य सेवक महिला यांनी दोषारोपाचा खुलासा सादर करुन त्या 12/04/2018 ते 12/12/2018 या कालावधीत आजारी असल्याने

गैरहजर होत्या असे नमुद केलेले आहे. संदर्भ क्रमांक 4 अन्वये मा. अधिष्ठाता, ससुन सर्वोपचार रुग्णालय पुणे यांनी दिनांक 12/04/2018 ते 12/12/2018 ची अनाधिकृत गैरहजेरी वैदयकीय कारणास्तव नसल्याचे नमुद केलेले आहे. सबब श्रीमती भारती टायटस जावळे यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 चे नियम 3 चे उल्लंघन केलेले असल्याने त्यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 चे नियम 27 नुसार 05 टक्के सेवा निवृत्ती वेतन कायमस्वरुपी करणे ही शिक्षा नमुद करुन संदर्भ क्रमांक 5 अन्वये अंतीम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती. संदर्भ क्रमांक 6 अन्वये अंतीम कारणे दाखवा नोटीस बजावले बाबत पोहच प्राप्त आहे. तसेच संदर्भ क्रमांक 7 अन्वये श्रीमती भारती टायटस जावळे यांनी खुलासा सादर केलेला असुन खुलासा असमाधानकारक असल्याने अमान्य करुन संदर्भ क्रमांक 8 च्या आदेशान्वये त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) 1982 चे नियम 27 नुसार 05 टक्के सेवा निवृत्ती वेतन कायमस्वरुपी कपात करणे ही शिक्षा अंतीम करण्यात आलेली असुन सदर अनाधिकृत गैरहजेरीचा निर्णय घेणे आवश्यक आहे.

त्या अर्थी श्रीमती भारती टायटस जावळे, आरोग्य सेवक महिला यांचा दिनांक 12/04/2018 ते 24/07/2020 हा अनाधिकृत गैरहजर कालावधी वित्त विभागाकडील शासन निर्णय सेनिये/1001/130/सेवा-4 दिनांक 02 जून 2003 मधील परिशिष्ट - एक नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 मध्ये प्रत्योजित केलेले अधिकारा नुसार नियम क्रमांक 63 (6) मध्ये नमुद केलेनुसार सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ (सेवानिवृत्ती विषयक लाभासह) अकार्यदिन करण्यात येत आहे. सदर आदेशाची अमंलबजावणी तात्काळ करण्यात यावी व संबधीताचे मुळ सेवा पुस्तकात याची नोंद घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडे सादर करावा.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202106011000579 असा आहे.

(राजेंद्र क्षीरसागर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्रीमती भारती टायटस जावळे, आरोग्य सेवक महिला, प्राथमिक आरोग्य केंद्र सलाबतपूर ता. नेवासा
द्वारा व प्रत :- वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र सलाबतपूर ता. नेवासा

२/- सदर आदेशाची प्रत संबंधीत कर्मचा-यांस मिळाल्या बाबतची तारखेसह स्वाक्षरी घेवुन ती पोहच या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना माहितीस्तव सादर,
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, नेवासा

(राजेंद्र क्षीरसागर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर